नि.फौ.ख.क्र. ४९३/२०१९
सरकार वि. प्रसाद
नि.क्र. २७

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी–**

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव :– सुभाष आनंद डिघे,
वय :– ३७ वर्ष, पद :– सह. पो.नि.,
नेमणुक :–विशेष सुरक्षा विभाग, मुंबई

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री. जी. एम. बारगजे यांचे तर्फे –**

०१. दि.२३.१२.२०१८ रोजी मी चिंचवड पोलीस स्टेशन येथे मी पोलीस उप.निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. सदरचे दिवशी महिला सहाय्यक कक्ष गुन्हे शाखा येथुन फिर्यादीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला होता, तो **नि.क्र. १७** वर आहे. त्यानुसार फिर्यादीस पोलिस स्टेशनला बोलावण्यात आले होते. सदर फिर्यादीचे सांगण्यावरुन फिर्यादी नि.क्र. १८ नोंदवण्यात आली वत्यावरुन प्रथम माहिती अहवाल गु.र.नं.४०२/२०१८ नोंदवण्यात आला. सदर गुन्हा तपासकामी माझेकडे वरीष्ठांनी सुपुर्त केला.

०२. मी तपासादरम्यान साक्षीदार जस की, फिर्यादीचे आई वडील यांचे जबाब नोंदवले. तसेच फिर्यादीचे काका,काकु,चुलत बहिण यांचे सुध्दा जबाब नोंदवले. फिर्यादीने तिचे मुलाला भांडणामुळे मानसिक धक्का झाल्याबद्दल कागदपत्र तपासादरम्यान मला दिले होते व ते मी दोषारोपत्रात सादर केलेले आहेत. मी आरोपीस चौकशी कामी बोलावले. त्यानंतर मी दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले. आरोपींची नावे प्रसाद चंद्रकांत कंगराळकर व चंद्रकला चंद्रकांत कंगराळकर असे होते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी आरोपी नामे प्रसाद हा हजर आहे. आरोपी क्र. २ चंद्रकला हया प्रस्तुत खटल्यादरम्यान मयत झाल्या आहेत त्यामुळे **नि.क्र. १** वर आदेश पारीत करुन त्यांचे विरोधातील प्रकरण हे बंद करण्यात आलेले आहे.

**उलटतपास आरोपी प्रसाद कडुन व्यक्तीशः –**

०३. लग्नात फिर्यादीला जे सोने देण्यात आले होते त्याबद्दलची कागदपत्रे अभिलेखावर सादर नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे लग्नात लग्नासाठी जो खर्च झाला आहे त्याबददलची सुध्दा कागदपत्रे अभिलेखावर सादर नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदर कागदपत्रे अभिलेखावर सादर नाहीत म्हणजे त्याबद्दल खर्च झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने तिला मारहाण झाल्याबाबतची वैद्यकिय कागदपत्रे सादर केली नाहीत.

०४. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही दि. २८/०५/२०१७ रोजी स्वतःहुन सासर सोडुन माहेरी आली. फिर्यादी व आरोपी हे दि. २८/०५/२०१७ पासुन वेगळे रहातात. हे म्हणणे खरे आहे की,फिर्यादीचा मुलगा देवांश हा दि. ११/०८/२०१७ रोजी दवाखाण्यात उपचाराकरीता दाखल झाला होता जेव्हा की आरोपी व फिर्यादी हे दि. २८/०५/२०१७ पासुन वेगळे रहात होते. मी सदर वैद्यकिय उपचाराची कागदपत्रे दवाखाण्यात जावुन पडताळुन पाहिलेली नाहीत.

०५. सदर साक्षीदारास उलटतपासणीदरम्यान आरोपी कडुन छायांकित दस्त जो की,

उपचाराबाबतचा आहे तो दाखवण्यात आला असल्यामुळे त्यास **नि.क्र. २८** दिला. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र. २८** यावरुन दवाखाण्यात रुग्ण देवांश दाखल व सुटटी झाल्याचे त्यास दिवशी दिसत आहे जेंव्हा की, तीन दिवस दवाखाण्यात रुग्ण असल्याबाबतची कागदपत्रे जोडण्यात आलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, देवांश फिर्यादी मुलगा हा दि. ०७/०६/२०१८ रोजी जेंव्हा की आरोपी व फिर्यादी विभक्त झाले होते तेव्हा तो दवाखाण्यात दाखल करण्यात आल्याचे दिसुन येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवांश याला मानसिक त्रास झाल्याबद्दलचा तपासादरम्यानचे दस्त अभिलेखावर दाखल नाही.

०६. मला सांगता येणार नाही की, देवांश याला डेंग्यु झालेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी हे विभक्त झाल्यानंतर दिड वर्षाने प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही देण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८/०५/२०१७ रोजी फिर्यादी हिने तिचे आईवडीलांना फोन केल्याबददल मी तपासादरम्यान कागदपत्रे प्राप्त केली नाहीत. मला माहित नाही की, फिर्यादी ही दि. २८/०५/२०१७ रोजी चिंचवड येथुन नेहरु नगर, पिंपरी येथे रात्री साडेबाराचे दरम्यान कशी गेली.

०७. मला माहित नाही की, फिर्यादीने विश्रांतवाडी येथे आरोपीने रुम घेतल्यानंतर तिने तिथे येण्यास नकार दिला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे फिर्यादीचे दागिणे असल्याबददल कोणतेही कागदापत्रे फिर्यादीने सादर केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घरी मी सदर दागिण्यांबाबत तपास केला नाही व फिर्यादीचे घरी सुध्दा त्याबाबत तपास केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, डोहाळे कार्यक्रमाचे बाबत फक्त फिर्यादीचे साक्षीदार यांचे जबाब नोंदवण्यात आलेले आहेत व आरोपींकडचे साक्षीदार नोंदवण्यात आलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या भावाचे लग्न बेळगाव, कर्नाटक येथे झाले व तेथे छायाचित्र जे घेण्यात आलेले आहेत त्याबाबत मी तपास केलेला नाही.

०८. मला माहित नाही की, आरोपी व फिर्यादी यांच्यात समझोता हा तक्रार देण्यादरम्यान झाला होता. मला माहित नाही की, फिर्यादी व आरोपी प्रसाद यांच्यात दोघांनी अर्धा अर्धा खर्च रहाण्याचा करायचा असे त्यांच्यात ठरले होते. मला माहित नाही की, आरोपी प्रसाद याने घटस्फोटासाठी प्रकरण दाखल केल्यामुळे फिर्यादीने प्रस्तुतचे प्रकरण आरोपींचे विरोधात दाखल केले. मला दोषारोप पत्र सादर करण्यासाठी सात महिने लागले कारण की, फिर्यादीचे साक्षीदार हे बाहेरगावी होते.

०९. **फेरतपास**–नाही

श्रवणोत्तर स्वीकृत

(मा.गो.मोरे) 25/02/25

दिनांक :– २५/०२/२०२५

**सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**पिंपरी, जि.पुणे.**